महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(AGovt. of Maharashtra Undertaking)
CIN:U40109MH2005SGC153645

दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
फॅक्स नं. : २६४७५८१४
email : ciro@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

औद्योगिक संबंध विभाग,
प्लॉट जी-९, प्रकाशगड, ४था मजला
प्रा. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

जा.क्र. : औसंवि/अ/७३७८

दिनांक :०४.०३.२०१६

प्रति,

क्षेत्रीय कार्यालयातील सर्व मुख्य अभियंता व अधीक्षक अभियंता
महावितरण.

**विषय : कंत्राटी कामगारांचे वेतन बँक खात्यामार्फत अदा करणेची बाब अनिवार्य करणे.**

या कार्यालयाच्या असे निदर्शनास येत आहे की, क्षेत्रीय स्तरावर आवश्यकतेप्रमाणे कंत्राटी कामगारांची सेवा कंत्राटदारामार्फत घेण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात येते, मात्र कंत्राटदार त्यांनी नेमलेल्या कंत्राटी कामगारांना त्यांच्या बँक खात्यामध्ये वेतन व अन्य देय रक्कम मुदतीत अदा करीत नाहीत.

या अनुषंगाने सर्व क्षेत्रीय कार्यालयांना कळविण्यात येते की, कंत्राटदारांमार्फत कंत्राटी कामगारांच्या बँक खात्यात रक्कम अदा केली जात असल्याची खात्री करून त्यानंतरच कंत्राटदाराचे देयक अदा करावे. कंत्राटी कामगारांना किमान वेतन कायद्याप्रमाणे रक्कम मिळते का व त्यांच्या संदर्भात अन्य रक्कमा जमा केल्या जातात का, याची पडताळणी उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांचेमार्फत होणे गरजेचे आहे. कंत्राटी कामगारांच्या बँक खात्याचा तपशील संकलित करून सर्व बाबींच्या पूर्ततेचा तपशील दि. ३१ मार्च २०१६ पर्यंत मुख्य कार्यालयास सादर करावा.

एप्रिल २०१६ नंतर कंत्राटी कामगारास बँक खात्यामार्फत रक्कम प्रदान होत नसल्याची तक्रार प्राप्त झाल्यास अशा मंडल/परिमंडल स्तरावरील संबंधित कर्मचाऱ्यांविरूध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, तसेच जे कंत्राटदार बॅक खात्यामार्फत अशी रक्कम प्रदान करीत नाहीत, त्या कंत्राटदारांना महावितरणमधील सदर कामकाज न देण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

कार्यकारी संचालक (मा.सं.)